

समाजकार्याचे अतिव्यापक, अतिविस्तृत व
बहुआयामी ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या
समाजकल्याण व समाजकार्य क्षेत्रातील गाढ्या व्यासंगी लेखिका
डॉ. प्राजक्ता टांकसाळे यांच्या व्यासंगी लेखणीतून व लेखणीच्या परिणत
आविष्कारातून साकारलेले अभ्यासशिल्प


# व्यावसायिक समाजकार्य



आधुनिक महाराष्ट्राचा समग्र इतिहास
व्ही. बी. पाटील
K'Sagar
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या
सर्व स्पर्धा परीक्षांमधील आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास
या अनिवार्य घटकाची परिपूर्ण तयारी
आधुनिक महाराष्ट्राचा
समग्र इतिहास
मुद्देनिहाय परामर्श
प्रा. व्ही. बी. पाटील
संयुक्त महाराष्ट्र
संकलन
के'सागर
K'Sagar

महाराष्ट्राचा भूगोल
प्रा. के. ए. खतीब
K'Sagar
राज्यसेवा पूर्व परीक्षेतील तद्वतच
पीएसआय, एसटीआय, एएसओ
पूर्व व मुख्य परीक्षांतील महाराष्ट्राचा
भूगोल या घटक विषयाच्या
अभ्यासक्रमानुसार रचना
३७ वी
सुधारित आवृत्ती
महाराष्ट्राचा
भूगोल
प्रा. के. ए. खतीब
संकलन, सुधारणा व विस्तार
के'सागर
K'Sagar
PUBLICATIONS
परीक्षाभिमुख रचना
नव्या धर्तीच्या प्रश्नांची तयारी
चित्रमय माहिती
अद्ययावत आकडेवारी
सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त





महाराष्ट्रातील समाजसुधारक
साहित्यिक, भारतीय विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती
के'सागर
K'Sagar
महाराष्ट्रातील
समाजसुधारक
साहित्यिक
भारतीय विचारवंत
व अन्य महनीय
व्यक्ती
के'सागर
३७ वी
आवृत्ती
K'Sagar
PUBLICATIONS

सीएसडब्ल्यू, बीएसडब्ल्यू, एमएसडब्ल्यू तद्वतच
महिला व बालकल्याण, समाजकल्याण, आदिवासी कल्याण
आदी विभागांतील अधिकारी पदांसाठी घेतल्या जाणाऱ्या
स्पर्धा परीक्षांकरिता रचना केलेला सर्वसमावेशक संदर्भ

# व्यावसायिक समाजकार्य

डॉ. प्राजक्ता टांकसाळे







K'Sagar
PUBLICATIONS

**Published By**
Sau. Shobhadevi Kshirsagar
**K'Sagar Publications**
'Suvarna Shilpa', 444/1 Shaniwar Peth,
Adjacent to Rajmachikar Flour Mill,
Near Dakshinabhimukhi Maruti Temple,
Pune - 411 030
☎: 24450125, 24455435
Fax : 91-020-24453065
***Email : customer@ksagar.com,***
***sales@ksagar.com***
***website : www.ksagar.com***

© K'Sagar Publications, Pune : 2015

Ninth Revised Edition : 2023
ISBN 978-93-84730-62-8

*The name K'Sagar is registered under the trade marks Act, 1999*

**Printed at**
Shree J Printers Pvt. Ltd.
'Dattakuti', 1416, Sadashiv Peth,
Pune 411 030.

**Typesetting**
K'Sagar Publications, Pune

**Cover Design**
K'Sagar Publications, Pune

**Price : 435/-**

**K'Sagar Book Centre**
Nutan Classic, 639, Narayan Peth, Appa Balwant Chowk, Pune - 411 030. ☎ (020) 24453065 / 9823121395 / 9545567862 / 63

**K'Sagar's House of Books**
Satya-ganesh Sankul, (Saraswati Nivas) 122, Budhwar Peth, Jogeshwari Mandir Lane, Pune - 411 002. ☎ (020) 24465650, 9923810566

**K'Sagar's House of Books**
39/1, Durga Chambers, Jogeshwari Mandir Lane, Pune - 411 002 ☎ (020) 24483166
9923906500 / 8087722277

Due care has been taken to ensure that the information provided in this book is correct. However, the authors and the publishers bear no responsibility for any damage resulting from any inadvertent omission or inaccuracy in the book.

## दोन शब्द ...

समाजकार्य शिक्षण आणि हे शिक्षण घेणाऱ्या संस्थांशी गेली अनेक वर्षे मी संलग्नित आहे. समाजाला प्रभावीपणे व सातत्याने सेवा देण्याचे कार्य करणारे हे शिक्षण, विविध स्तरांवर दिले जाते. हे शिक्षण घेणारे महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थी मराठी भाषिक असतात. त्यांना या अभ्यासक्रमास उपयुक्त असणारी पुस्तके मात्र मराठी माध्यमातून उपलब्ध नसतात. मराठी भाषिक विद्यार्थ्यांची ही अडचण डॉ. प्राजक्ता टांकसाळे यांनी 'व्यावसायिक समाजकार्य : संकल्पना व सैद्धांतिक ज्ञान' या पुस्तकाच्या रूपाने दूर केली आहे. समाजकार्य या विषयाचे दर्जेदार ज्ञान संपादन करण्याची मोठी सोय या पुस्तकाद्वारे झाली आहे.

समाजकार्याचे शास्त्रीय ज्ञान अतिव्यापक, अतिविस्तृत व बहुआयामी स्वरूपाचे आहे. असे हे ज्ञान संकलितरीत्या विद्यार्थ्यांसमोर या पुस्तकाद्वारे प्रथमच येत आहे हे विशेष! अभ्यास, परीक्षा याचबरोबर प्रत्यक्ष सेवाकार्य करण्यात व विद्यार्थ्यांतून योग्य समाज कार्यकर्ता घडविण्यात या ज्ञानाचा उपयोग होईल हे निश्चित. एक अत्यंत गहन व चिंतनीय विषय तोही मराठीत वाचकांसमोर उलगडण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याबद्दल लेखिका अभिनंदनास पात्र आहे. गेली जवळपास २० वर्षे या क्षेत्रात ज्ञान संपादनाचे, प्रत्यक्ष समाजकार्य करण्याचे व त्यातून ते ज्ञान या पुस्तकाद्वारे इतरांना उपलब्ध करून देण्याचे लेखिकेचे कार्य स्पृहणीय आहे.

डॉ. प्राजक्ता टांकसाळे यांना मी त्यांच्या विद्यार्थि-दशेपासून ओळखतो. एक व्यावसायिक समाजकार्यकर्ता व समाजकार्य शिक्षक म्हणून त्यांचा होत गेलेला विकास मी पाहिला आहे. त्यांनी मराठी भाषिक विद्यार्थ्यांची एक अडचण जशी दूर केली तशीच या क्षेत्रातील अन्य ज्ञान भांडाराची विद्यार्थ्यांना दुसऱ्या पुस्तकाच्या रूपाने सोय करून द्यावी ही सदिच्छा.

तारीख : २५-२-२०००

पु. ल. भांडारकर

**पु. ल. भांडारकर**
माजी प्राध्यापक
स्नातकोत्तर समाजशास्त्र विभाग व
माजी कुलगुरू
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

# अनुक्रमणिका


१. **समाजकार्याचा इतिहास** ११

- ❖ समाजकार्याचा ब्रिटनमधील इतिहास
- ❖ समाजकार्याचा भारतातील इतिहास
- ❖ समाजकार्याचा अमेरिकेतील इतिहास

२. **व्यावसायिक समाजकार्य** २१

- ❖ व्यावसायिक समाजकार्य
- ❖ कल्याण व विकास

३. **समाजकार्यातील मूलभूत गृहीत बाबी मूल्ये व आचारसंहिता** २९

- ❖ मूलभूत गृहीते व तत्त्वे
- ❖ समाजकार्याची आचारसंहिता
- ❖ नीतितत्त्वांचा जाहीरनामा (२००२)
- ❖ नैतिक जबाबदाऱ्या

४. **समाजकार्याच्या व्याख्या** ४३

- ❖ निवडक व्याख्या व स्पष्टीकरणे
- ❖ सारांश

५. **समाजकार्याची वैशिष्ट्ये** ४९

- ❖ समाजकार्याची वैशिष्ट्ये
- ❖ भारतीय समाजातील वैशिष्ट्ये

६. **समाजकार्याचे उद्देश** ५२

- ❖ समाजकार्याचे उद्देश

७. **समाजकार्याचे सिद्धांत** ५६

८. **समाजकार्याचे तत्त्वज्ञान** ५८

- ❖ समाजकार्याचे तत्त्वज्ञान

९. **समाजकार्य - एक वैज्ञानिक पद्धत** ६२

- ❖ वैज्ञानिक पद्धत

१०. **समाजकार्य व अन्य अभ्यासशास्त्रे** ६४

- ❖ समाजकार्य व अन्य अभ्यासशास्त्रे

११. **समाजकार्याचे सैद्धांतिक ज्ञान** ७१

- ❖ समाजकार्याचे सैद्धांतिक ज्ञान.
- ❖ समाजशास्त्रीय ज्ञानाधार
- ❖ टालकॉट पार्सन यांचा सामाजिक व्यवस्थेचा सिद्धांत
- ❖ टॉलकॉट पार्सन यांचा सामाजिक क्रियेचा सिद्धांत
- ❖ सी. एच. कुले यांचा सामाजिकीकरणाचा सिद्धांत
- ❖ जी. एच. मीड यांचा सामाजिकीकरणाचा सिद्धांत
- ❖ रॉबर्ट मर्टन यांचा मार्ग परावृत्तीचा सिद्धांत
- ❖ कार्ल मार्क्सचा सामाजिक स्तरीकरणाचा सिद्धांत
- ❖ कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद
- ❖ माल्थस यांचा लोकसंख्याविषयक सिद्धांत
- ❖ प्राथमिक गटासंबंधी कुले यांचे विचार
- ❖ इमिल डरखीम यांचे सामाजिक नियंत्रणासंबंधीचे विचार
- ❖ विल्फ्रोडा परैतो यांचे विचार
- ❖ मार्क्स वेबर यांचे सामाजिक क्रियेसंबंधीचे विचार
- ❖ जॉर्ज सिमेल यांचे सामाजिक प्रक्रियेसंबंधी विचार
- ❖ विल्यम समनर यांची संकल्पना
- ❖ ऑगस्त कॉम्त यांचे विचार
- ❖ सामाजिक सहसंबंध जाळे सिद्धांत
- ❖ समाजकार्याचा मानसशास्त्रीय ज्ञानाधार
- ❖ मनोविश्लेषणात्मक मार्ग
- ❖ ऑटो रँक यांचा व्यक्तिमत्त्वाचा सिद्धांत
- ❖ वर्तनविषयक मार्ग
- ❖ चेतापदशा (Neurosis)
- ❖ अस्तित्ववादी उपचारपद्धत
- ❖ रुग्ण/सेवार्थी केंद्रित उपचारपद्धत
- ❖ गॅस्टॉल्ट थेरपी

- जैविक दृष्टिकोन
- बोधात्मक मार्ग/दृष्टिकोन
- बुद्धिमत्तेचे सिद्धांत
- मानवशास्त्राचे ज्ञान
- समाजकार्याचे सैद्धांतिक ज्ञान
- सैद्धांतिक ज्ञान निर्मितीचे मार्ग
- समाजकार्यात उपयोगी ज्ञान
- समाजकार्यात सैद्धांतिक ज्ञानाचा उपयोग

**१२. समाजकार्याच्या पायऱ्या** १९८

**१३. समाजकार्याचे प्रकार** ११९

- समाजकार्याचे विविध पैलू

**१४. समाजकार्याची व्याप्ती व क्षेत्रे** १२५

- समाजकार्याची कार्यस्थळे
- कुटुंब कल्याण व बाल कल्याण सेवा क्षेत्र
- स्त्री कल्याण
- वृद्ध कल्याण
- अपंग कल्याण
- कुटुंब व बाल कल्याण क्षेत्रात कार्य करणारा समाज कार्यकर्ता
- वैद्यकीय चिकित्सा व मानसोपचार सेवा क्षेत्र
- वैद्यकीय समाज कार्यकर्ता
- मानसोपचार सेवा क्षेत्र
- कामगार कल्याण सेवा क्षेत्र
- अपराध व सुधारात्मक सेवा क्षेत्र
- सामाजिक सुरक्षेचे मार्ग
- समुदाय विकास
- समुदाय विकास कार्यक्रम

**१५. समाजकार्याच्या पद्धती आणि विविध पद्धतींतील समानता** १४८

- समाजकार्याच्या पद्धती
- विविध पद्धतीतील साम्ये
- सामाजिक व्यक्तिसाहाय्य कार्य
- व्यक्तिसाहाय्य कार्याचे सिद्धांत
- व्यक्तिसाहाय्य कार्याचे घटक
- व्यक्तिसाहाय्य कार्याच्या पायऱ्या
- व्यक्तिसाहाय्य कार्यातून मदत
- व्यक्तिसाहाय्य कार्यकर्ता
- व्यक्तिसाहाय्य कार्यात मुलाखत
- व्यक्तिसाहाय्य कार्यात अहवाल लेखन
- कार्यकर्ता व सेवार्थी यांच्यातील नातेसंबंध
- सामाजिक गटकार्य
- गटकार्याचे तत्त्वज्ञान
- गटकार्याचे सिद्धांत
- कार्यकर्त्याची भूमिका
- समुदाय संघटन
- समुदाय संघटनाचे सिद्धांत
- समाज कल्याण प्रशासन
- समाजकार्य प्रशासन  सामाजिक कायदे
- सामाजिक कायदे
- सामाजिक संशोधन
- संशोधनाचे टप्पे/पायऱ्या
- सामाजिक क्रिया किंवा कृती
- सामाजिक क्रिया नमुना
- सामाजिक क्रियेचे सिद्धांत
- सामाजिक क्रियेच ठळक उद्देश
- सामाजिक क्रियेचे प्रकार
- सामाजिक क्रियेतील रणनीती वा व्यूहरचना
- सामाजिक क्रियेच्या पायऱ्या
- सामाजिक क्रियेत सहकार
- सामाजिक क्रिया व समुदाय संघटन
- सामाजिक क्रिया व सामाजिक आंदोलन
- सामाजिक क्रिया व क्रांती
- सामाजिक क्रिया करणारा समाज कार्यकर्ता
- मर्यादित विकासाची काही कारणे
- सामाजिक क्रियेचे स्थान व महत्त्व

**१६. समाजकार्यातील मदत** २११

- समाजकार्यातील मदत

**१७. समाजकार्याची कार्यपद्धत** २१८
- समाजकार्याची कार्यपद्धत

**१८. समाज कार्यकर्ता** २१९

**१९. समाज कार्यकर्त्याचे दृष्टिकोन** २२०
- समाज कार्यकर्त्यांचे दृष्टिकोन

**२०. समाज कार्यकर्त्यातील आवश्यक कौशल्ये व तंत्रे** २२३
- समाज कार्यकर्त्यातील आवश्यक कौशल्ये व तंत्रे

**२१. समाज कार्यकर्त्याच्या भूमिका** २२७
- समाज कार्यकर्त्याच्या भूमिका

**२२. समाजकार्य – एक 'व्यवसाय'** २२८
- समाजकार्याच्या संदर्भात व्यवसायाची लक्षणे
- व्यवसाय म्हणून समाजकार्यासमोरील आव्हाने
- व्यावसायीकरण होण्याच्या मार्गातील समस्या

**२३. समाजकार्याचे भारतातील परंपरागत स्वरूप** २३९
- भारतातील धार्मिक व परंपरागत समाजसेवा

**२४. व्यावसायिक समाजकार्य व ऐच्छिक समाजकार्य : तुलना, फरक व साम्य** २४१
- व्यावसायिक व स्वैच्छिक समाजकार्यातील फरक दर्शविणारी आकृती

**२५. सद्यःकाळात व्यावसायिक समाजकार्याचे वाढते महत्त्व व गरज** २५०
- समाजकार्याचे वाढते महत्त्व
- समाजकार्याचे सद्यःकालीन स्वरूप
- समाजकार्याचे भवितव्य

**२६. भारतीय समाजात व्यावसायिक समाजकार्य** २५८
- भारतातील व्यावसायिक समाजकार्य
- बदलता भारतीय समाज
- व्यावसायिक समाजकार्यासमोरील समस्या व उपाय

**२७. व्यावसायिक समाजकार्याबद्दल गैरसमज** २६१

**२८. समाजकल्याण** २६५
- समाजकल्याण म्हणजे काय ?
- समाजकल्याणाचे उद्देश
- समाजकल्याणाचे नमुना प्रकार
- समाजकल्याणाचा भारतातील इतिहास
- समाजकार्याची विविध अंगे व व्याप्ती

**२९. सामाजिक सेवा** २७१

**३०. सामाजिक सुरक्षितता** २७३

**३१. सामाजिक सुधारणा** २७५
- सामाजिक सुधारणा
- बंगालमधील समाजसुधारणा
- कर्नाटकातील सामाजिक सुधारणा
- एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणा

**३२. सामाजिक संरक्षण** २८८

**३३. गांधीजींच्या विचारांचे समाजकार्याला योगदान** २८९
- समाजकार्य मूल्यांशी संबंधित गांधीजींची मूल्ये

**३४. गांधीजींचा विधायक कार्यक्रम** २९७
- गांधीजींचा विधायक कार्यक्रम
- संदर्भसूची

# मनोगत...

समाजकार्याच्या शिक्षिकेचे कार्य करीत असताना व त्याच वेळी कार्यानुभव घेत असताना सत्यस्थिती, गरजा व उपलब्ध ज्ञान यांचा ताळमेळ घालण्याची संधी मला मिळाली.

समाजकार्याची ज्ञानसंपदा प्रामुख्याने इंग्रजी भाषेतून उपलब्ध आहे. अन्य भाषांमधून व प्रामुख्याने मराठी माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी लागणारी पुस्तके समाजकार्यात अभावानेच आढळतात. मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मर्यादित अनुभवामुळे, आकलनाच्या प्रगल्भतेतील मर्यादांमुळे व इतर कारणांमुळे ते इंग्रजीत उपलब्ध ज्ञानसाठ्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. विषय कळतो पण लिहिता येत नाही अशीही परिस्थिती दिसते. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत जिज्ञासू, अभ्यासक, मेहनती, खऱ्या अर्थाने समाज कार्यकर्ता होण्याची क्षमता असणारे विद्यार्थी असतात. पण केवळ मराठीतून या विषयावर पुस्तक नसल्यामुळे सखोल ज्ञानापासून ते वंचित राहतात. या विध्यार्थ्यांना शिकवताना तासिकांच्या मर्यादेमुळे ज्ञानभंडाराची ओळखही मर्यादित प्रमाणात करून देता येते. अशा या सर्व विद्यार्थ्यांची मराठीतून ज्ञान उपलब्ध करून घेण्याची धडपड, तळमळ, त्यांना येणारे अडथळे, त्यांच्या मर्यादा मी गेली अनेक वर्षे अनुभवते आहे व त्याने व्यथित होते आहे. या विद्यार्थ्यांनीच लेखनाचा हा प्रयत्न करण्याची प्रेरणा मला दिली आहे. हा अभ्यासविषय मराठीतून, एकत्रित एका ठिकाणी व सविस्तर रीतीने मांडण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

समाजकार्याचा प्रत्यक्ष कार्यानुभव घेताना जे काम विद्यार्थी करतात त्याचे सैद्धांतिक स्पष्टीकरण त्यांना मिळावे, त्या कामाचे मूळ शोधता यावे व कामाचा सैद्धांतिक पाया विद्यार्थ्यांना स्पष्ट व्हावा हा हे लिखाण करण्याचा प्रमुख उद्देश आहे. कामाचा असा ज्ञानाशी संबंध पाहण्यास या लेखनाचा उपयोग झाल्यास समाजकार्याचा अर्थ स्पष्ट होण्यास व प्रत्यक्ष काम प्रभावीपणे करण्यास विद्यार्थ्यांना मदत होईल. असे स्पष्ट चित्रण झाल्याने परीक्षेत एका प्रश्नाचे उत्तर लिहिताना अन्य मुद्द्यांचा मूळ उत्तरात योग्य प्रकारे अंतर्भाव करून उत्तर लिहिणे विद्यार्थ्यांना सुलभ होईल.

समाजकार्य पदवी परीक्षा व पदव्युत्तर परीक्षेचा अभ्यास करण्यास तसेच स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासात या लिखाणाचा उपयोग होणार आहे. याचबरोबर समाजकार्य व्यावसायिकांना हे लिखाण नेहमीकरिता वाचनीय, चिंतनीय ठरेल अशी खात्री वाटते.

समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना क्षेत्रकार्य करणे अनिवार्य असते. हे क्षेत्रकार्य करताना, तसेच त्याचे अहवाललेखन करताना या लिखाणाचा उपयोग विद्यार्थ्यांना निश्चितच होईल. याशिवाय व्यावसायिक समाज कार्यकर्ता या नात्याने त्याचा विकास करण्यात हे लिखाण नक्कीच उपयोगाचे ठरणार आहे. त्या दृष्टीने या लिखाणात समाजकार्य, त्याचा अर्थ, गृहीत बाबी, मूल्ये, मापदंड, व्याख्या, वैशिष्ट्ये, उद्देश, सिद्धांत, तत्त्वज्ञान, सैद्धांतिक पाया यांचे विवेचन आहे. तसेच समाजकार्याच्या पायऱ्या, प्रकार, व्याप्ती, पद्धती यांचे वर्णन आहे. याशिवाय समाजकार्यातील मदत, कार्यपद्धत, दृष्टिकोन, समाजकार्य व्यवसाय या मुद्द्यांचा यांत अंतर्भाव आहे. प्रत्येक समाज कार्यकर्त्याजवळ जे मूलभूत ज्ञान, मूल्ये व विचार असायला हवेत, ते संकलित करून मराठीत देण्याचा प्रयत्न, हे या लिखाणाचे वैशिष्ट्य आहे.

समाजकार्याशी संबंधित अन्य संकल्पनांचे यात विवेचन आहे. जसे– ऐच्छिक समाजकार्य, समाजकल्याण, सामाजिक सुरक्षा, सामाजिक सुधारणा, सामाजिक सेवा इत्यादी. भारतातील समाजकार्याचा वेगळा व विशेष विचार या लिखाणात जसा केला आहे तसाच गांधीजींच्या समाजकार्याच्या व्यावसायिक समाजकार्यास असणाऱ्या योगदानाचा अभ्यासही या लेखात आहे.

भारतीय समाज मूल्यांवर आधारलेला आहे. लोकशाही येथे रुजलेली आहे. भारतीय समाजाचे एकात्मिक स्वरूप, भारतीय समाजाची परिस्थिती व गरज यांना अनुसरून व्यावसायिक समाजकार्याचा

सुयोग्य वापर कसा करता येईल व त्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा उपयोग करताना त्यात काय बदल करावे लागतील, याचा विचार केला आहे. व्यावसायिक समाजकार्याचा भारतीय स्थितीत होणारा अर्थ व स्वरूप कसे लक्षात घ्यावे हे या लिखाणात विचारात घेतले आहे. समाजकार्याचे विद्यार्थी ज्या समाजाचे घटक आहेत त्या संदर्भात केलेले हे लिखाण समाजकार्याला त्यांच्या अनुभवातील जगाशी प्रत्यक्ष जोडण्यास व समजून घेण्यास साहाय्य करेल अशी खात्री वाटते.

महात्मा गांधीजींची विचारप्रणाली, समाज विकासाचे लक्ष्य ठेवणारे भारतीय संविधान, कल्याणकारी राज्याची कल्पना, मानवतेचे तत्त्वज्ञान, लोकशाही मूल्ये, मानवाधिकार या भारतीय समाजात अस्तित्वात असणाऱ्या समाजाच्या जडणघडणीला अनुरूप संकल्पनांचा, व्यावसायिक समाज-कार्यातील विचार, सिद्धांत व तत्त्वज्ञानाशी असणारा जवळचा संबंध यात स्पष्ट केला आहे.

पाश्चात्त्य देशातील समाजकार्याला जसेच्या तसे भारतात वापरता येणार नाही, त्याचे भारतानुरूप रूपांतर करावे लागेल, विचार करावा लागेल व तो कसा करता येईल हे या लिखाणात स्पष्ट केले आहे.

हे लेखन करताना ज्या लेखकांच्या लिखाणाचा मी उपयोग केला आहे त्यांची मी मनःपूर्वक आभारी आहे. उपयोगात आणलेल्या अशा पुस्तकांची सूची शेवटी देण्यात आलेली आहे.

या संदर्भाच्या यापूर्वीच्या चार आवृत्यांचे प्रकाशन श्री साईनाथ प्रकाशन नागपूर यांनी केले असून पुढील आवृत्त्यांचे प्रकाशनाचे हक्क के'सागर पब्लिकेशन्स यांना देण्यात आले असल्याने आज मूळ संदर्भाची सातवी अन् के'सागर पब्लिकेशन्सद्वारा प्रकाशित होणारी तिसरी आवृत्ती आज मी विद्यार्थी मित्रांच्या हाती सोपवित आहे.

या लिखाणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या ज्यांची-ज्यांची मदत झाली आहे, त्या सर्वांची मी मनःपूर्वक आभारी आहे.

१५. हुंडाप्रतिबंधक कायदा १९६१ मध्ये खालीलपैकी कोणत्या वर्षी सुधारणा करण्यात आल्या आहेत?
(अ) १९७६ (ब) १९८६
(क) १९९६ (ड) २००६

१६. ब्रिटिश राजवटीत संमत करण्यात आलेल्या आणि सारडा ॲक्ट किंवा शारदा कायदा म्हणून प्रसिद्ध असलेल्या कायद्यानुसार .... वर्षांखालील मुलींच्या विवाहास बंदी घालण्यात आली होती.
(अ) १० (ब) १२
(क) १४ (ड) १५

१७. सारडा ॲक्ट म्हणून प्रसिद्ध असलेला बालविवाह प्रतिबंधक कायदा खालीलपैकी कोणत्या वर्षी संमत करण्यात आला होता?
(अ) १९२५ (ब) १९२७
(क) १९२९ (ड) १९३१

१८. सन १९२९ च्या बालविवाह प्रतिबंधक कायद्यात सन १९७८ मध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार विवाहासाठी मुलाचे व मुलीचे वय अनुक्रमे किती वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे?
(अ) २१ व १८ (ब) २५ व २२
(क) २१ व १९ (ड) २१ व २१

१९. (१) बालविवाहामुळे बालपणीच संसाराची जबाबदारी स्वीकारावी लागल्यामुळे मुलींचे शिक्षणाचे व प्रगतीचे सर्व मार्ग बंद होतात.
(२) बालविवाहामुळे स्त्रीवर लहान वयातच येणारी मातृत्वाची जबाबदारी तिच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरते.
(३) बालविवाहामुळे लहान वयातच विविध जबाब-दाऱ्या अंगावर पडल्याने स्त्री जबाबदाऱ्या पेलण्यास सक्षम बनते व तिचा सर्वांगीण विकास साध्य होतो.
(अ) फक्त पहिली दोन विधाने बरोबर आहेत.
(ब) फक्त पहिले व तिसरे विधान बरोबर आहे.
(क) फक्त दुसरे व तिसरे विधान बरोबर आहे.
(ड) तिन्ही विधाने बरोबर आहेत.

१५. (ब) १६. (ब) १७. (क) १८. (अ) १९. (अ)

**समग्र मानवी हक्क (के'सागर) या पुस्तकातून उद्धृत**

# अल्पपरिचय



नागपूर विद्यापीठातून प्रथम क्रमांकाने एमएस-डब्ल्यूची पदवी मिळ-वल्यानंतर १९८९ साली लेखिकेने पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली. मातृसेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, नागपूर येथे ३३ वर्षे अध्यापनाचे कार्य त्यांनी केले.

विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत लघुशोध निबंध, संशोधनपर तसेच अन्य अभ्यासाधारित लिखाण त्यांनी केले आहे. त्यांनी समाजकार्य सेवा देणाऱ्या अनेक प्रकरणांच्या निर्मितीचे कार्य तसेच त्यांच्या विकासास हातभार लावण्याचे कार्य निरंतरपणे केलेले आहे जसे- शालेय समाज-कार्य, अपंग संस्कार केंद्र, कुटुंब सल्ला सेवा इत्यादी.

व्यावसायिक समाजकार्याचे व संलग्नित इतर विषयांचे ज्ञान मराठीतून विद्यार्थ्यांपर्यंत व वाचकांपर्यंत त्यांनी पोहोचवलेले आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीच्या प्रकाशनापूर्वी लेखिकेची अन्य ८ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. ती पुढीलप्रमाणे-

(१) व्यक्तिसहकार्य भाग १
(२) व्यक्तिसहकार्य भाग २
(३) व्यक्तिसहकार्य भाग ३
(४) गटकार्य भाग १
(५) गटकार्य भाग २
(६) व्यावसायिक समाजकार्य : विचारधारा व इतिहास
(७) समाजकार्यकर्ता : एक व्यावसायिक
(८) एकात्मिक समाजकार्य

या पुस्तकांतून समाजकार्याचे पायाभूत सैद्धांतिक ज्ञान विद्यार्थी व वाचकांना मराठीतून उपलब्ध झालेले असून त्याला मोठी मागणी व मान्यता मिळालेली आहे. लेखिकेचे ज्ञान, अभ्यास व प्रत्यक्ष कार्या-नुभवाची त्याला असणारी जोड या वैशिष्ट्यांमुळे लेखिकेची पुस्तके संबंधितांना पथदर्शक ठरली आहेत.

या व्यतिरिक्त स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांना वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरांच्या रूपात हे ज्ञान पुढील पुस्तकांच्या रूपाने लेखिकेने उपलब्ध करून दिले आहे.

(१) समग्र समाजकल्याण अध्ययन
(२) संपूर्ण समाजकल्याण अध्ययन
(३) संपूर्ण महिला व बालकल्याण इत्यादी

प्रस्तुत पुस्तक समाजकार्यांच्या संकल्पनांचे मूलभूत ज्ञान देते; समाजकार्याच्या सैद्धांतिक पायाचे स्वरूप मांडते. बीएसडब्ल्यू, एमएस-डब्ल्यू व विविध शासकीय पदांसाठी विविध स्तरांवर घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल. या मूलभूत ज्ञानामुळे समाजकार्याच्या पद्धती, विचारधारा यांचे विद्यार्थ्यांना सुलभरीत्या आकलन होईल.